नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २४३ Issue - 243 | वार रविवार दि. १९ जानेवारी २०२५ Blow- Sunday Date 19 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारताचा संघ जाहीर!

मुंबई : आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी बीसीसीआयने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील १५ सदस्यीय भारतीय संघ जाहीर केला आहे. हाच संघ इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळणार आहे. या संघाच्या उपकर्णधारपदी युवा खेळाडू शुबमन गिलची वर्णी लागली आहे. त्याचबरोबर इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेदरम्यान जसप्रीत बुमराह खे-ळणार नसल्याने त्याच्या जागी हर्षित राणा खेळणार आहे.

**भारताचा १५ सदस्यीय संघ :** रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत, रवींद्र जडेजा.

# राज्यातील पालकमंत्र्यांची यादी जाहीर

## गडचिरोलीच्या पालकमंत्रीपदी मुख्यमंत्री फडणवीस; अजितदादांकडे बीड, पुण्याची जबाबदारी, धनंजय मुंडेंचा पत्ता कट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार आणि खातेवाटप होऊन एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाल्यानंतर अखेर आज (१८ जानेवारी) पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचं पालकमंत्रिपद असणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे आणि मुंबई शहरचं पालकमंत्रिपद असणार आहेत. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्हा आणि बीड जिल्ह्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. मंत्री धनंजय मुंडे यांना या पालकमंत्रिपदाच्या यादीतून वगळण्यात आलं आहे. आता बीडचे पालकमंत्री अजित पवार असणार आहेत.



तसेच धनंजय मुंडे यांना कोणत्याही जिल्ह्याचं पालकमंत्रिपद देण्यात आलेलं नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी हा धक्का मानला जात आहे.

गडचिरोली - देवेंद्र फडणवीस., नागपूर - चंद्रशेखर बावनकुळे., ठाणे - एकनाथ शिंदे., पुणे - अजित पवार., बीड - अजित पवार., सिंधुदुर्ग- नितेश राणे., अमरावती - चंद्रशेखर बावनकुळे., अहिल्यानगर - राधाकृष्ण विखे पाटील., वाशिम - हसन मुश्रीफ., सांगली - चंद्रकांत पाटील., सातारा -शंभुराजे देसाई., छत्रपती संभाजी नगर - संजय शिरसाट., जळगाव - गुलाबराव पाटील., यवतमाळ - संजय राठोड., कोल्हापूर - प्रकाश आबिटकर, सह पालकमंत्री माधुरी मिसाळ., अकोला - आकाश फुंडकर., भंडारा - संजय सावकारे., बुलढाणा - मकरंद जाधव., चंद्रपूर - अशोक ऊईके., धाराशीव - प्रताप सरनाईक., धुळे - जयकुमार रावल., गोंदिया - बाबासाहेब पाटील., हिंगोली - नरहरी झिरवळ., लातूर - शिवेंद्रसिंग भोसले., मुंबई शहर - एकनाथ शिंदे., मुंबई उपनगर -आशिष शेलार/ सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा., नांदेड - अतुल सावे., नंदुरबार - माणिकराव कोकाटे., नाशिक - गिरीष महाजन., पालघर - गणेश नाईक., परभणी - मेघना बोर्डीकर., रायगड - अदिती तटकरे., सिंधुदुर्ग- नितेश राणे., रत्नागिरी - उदय सामंत., सोलापूर - जयकुमार गोरे., वर्धा - पंकज भोयर., जालना - पंकजा मुंडे


# १० वी, १२ वीच्या हॉल तिकिटांवर जातप्रवर्गाचा उल्लेख; दहावी, बारावी परिक्षेआधीच वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाकडून घेतली जाणारी इयत्ता दहावी व बारावीची परीक्षा आता सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठीचं हॉल तिकिट (प्रवेशिका) शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलं आहे. विद्यार्थी अथवा त्यांच्या शाळा संकेतस्थळावरून हे हॉल तिकिट डाऊनलोड करून घेऊ शकतात. परंतु, हे हॉल तिकीट पाहून एकच गोंधळ उडाला आहे. कारण विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटांवर कास्ट कॅटेगरी (जात प्रवर्गाची श्रेणी) नमूद करण्यात आली आहे. हे पाहून शिक्षण तज्ज्ञ व शिक्षकांकडून आश्चर्य व्यक्त होत आहे. यावरून विरोधक शिक्षण मंडळावर टीका करत आहेत. दरम्यान, माध्यमिक व उच्च (पान २ वर...)

# सैफ अली खान हल्ल्यातील संशयित आरोपी छत्तीसगडमधून ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : प्रसिद्ध अभिनेता सैफ अली खान याच्यावर गुरुवारी मध्यरात्री भीषण हल्ला झाला. हल्ला झाल्यानंतर आरोपी फरार झाला होता. या फरार आरोपीच्या शोधासाठी मुंबई पोलिसांनी जंगजंग पछाडलं. त्याच्या शोधासाठी मुंबई पोलिसांनी ३० पथकेही तैनात केली होती. अखेर एका संशयिताला छत्तीसगडच्या दुर्गा रेल्वे स्थानकातून ताब्यात गेण्यात आलं आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

मुंबई पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आज दुपारी एका संशयिताला दुर्ग येथे ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती रेल्वे सुरक्षा बलाच्या अधिकाऱ्यांनी दिली. मुंबईतील लोकमान्य टिळक टर्मिनस ते कोलकाता शालिमारपर्यंत धावणाऱ्या ज्ञानेश्वरी एक्स्प्रेसमध्ये हा संशयित आरोपी होता. ही रेल्वे एलटीटी येथून ८.३५ वाजता निघते, तर ४.३५ वाजता शालिमार येथे पोहोचते.


मुंबई पोलिसांच्या सूत्रांनी सांगितलं, ट्रेनमध्ये चढलेल्या एका व्यक्तीचा शोध घेण्यासाठी त्याचा फोटो आरपीएफला पाठवण्यात आला होता. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आधारे छत्तीसगडमधील आरपीएफने जनरल डब्यातून प्रवास करणाऱ्या एका व्यक्तीला ताब्यात घेतलं.

यानंतर मुंबई पोलिसांचं एक पथक हवाईम ार्गे छत्तीसगडला पोहोचले आणि त्याला ताब्यात घेतलं. पोलीस आणि आरपीएफ त्याची चौकशी करत आहेत. दरम्यान, त्याचं नाव आकाश कनौजिया असून मुंबई पोलीस अधिक चौकशी करणार आहेत. हल्लेखोराने सैफच्या घरातून बाहेर पडल्यावर कपडे बदलले होते. दोन ठिकाणी तो सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाला होता, त्याआधारे पोलिसांनी तपास सुरू केला होता. अभिनेत्यावर हल्ला होऊन ५० तासांहून अधिक काळ लोटला, तरीही हल्लेखोराचा शोध सुरूच आहे.

घुसखोराचे एक ताजे सीसीटीव्ही फुटेज आदल्या दिवशी समोर आले होते, ज्यामध्ये तो सैफ अली खा-नवर हल्ला केल्यानंतर दादरमधील एका दुकानातून हेडफोन खरेदी करताना दिसला होता. तसंच, मध्य प्रदेशमधूनही एका संशयिताला ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे.

# महिला डॉक्टरवर बलात्कार-खून प्रकरणात संजय रॉय दोषी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



### २० जानेवारीला होणार शिक्षेची घोषणा

कोलकाता : मागच्या वर्षी ऑगस्ट महिन्यात कोलकाताच्या आर. जी. कर महाविद्यालयातील ट्रेनी डॉक्टरवर बलात्कार आणि खून केल्याप्रकरणी सियालदह सत्र न्यायालयाने आज मुख्य आर-ोपी संजय रॉयला दोषी ठरविले. आता सोमवारी (दि. २० जा-नेवारी) संजय रॉयला काय शिक्षा मिळते, याची घोषणा केली जाईल. सत्र न्यायालयाचे न्यायाधीश अनिर्बन दास यांनी हे प्रकरण सुनावणीस घेतल्यानंतर ५७ दिवसांनी निर्णय सुनावला आहे. यावेळी दास यांनी संजय रॉयला दोषी ठरविताना सांगितले की, तुला शिक्षा मिळायलाच हवी.

कोलकातामध्ये सदर घटना घडल्यानंतर देशभरात या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला होता. कोलकाता पोलिसांचा नागरी स्वंयसेवक म्हणून काम करणाऱ्या संजय रॉयने गुन्हा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ९ ऑगस्ट २०२४ रोजी त्याला अटक करण्यात आली होती. आज सुनावणी झाल्यानंतर न्यायाधीशांनी सांगितले की, आम्ही सर्व पुरावे आणि साक्षीदार तपासले आहेत. तसेच वकिलांचा युक्तिवादही ऐकला. या सर्वांच्या आधारे आरोपी दोषी असल्याचे सिद्ध होते. त्यामुळे त्याला शिक्षा झालीच पाहीजे.

सत्र न्यायालयात सुनावणीदरम्यान आरोपी संजय रॉयने प्रश्न विचारला की, ज्यांनी मला फसवले, त्यांना का सोडले जात आहे? यावर न्यायाधीशांनी सोमवारी त्याच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकणार असल्याचे सांगितले. तोपर्यंत संजय रॉयची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली. संजय रॉयचा इशारा आर. जी. कर महाविद्यालयाचे प्राचार्य संदिप घोष यांच्याकडे होता. ज्यांना पुराव्यात फेरफार केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. मात्र कालांतराने त्यांना जामीनावर सोडण्यात आले.

कोलकाता येथील आर. जी. कर रुग्णालयात ट्रेनी डॉक्टर म्हणून काम करणारी एक महिला डॉक्टर ८ ऑगस्टच्या रात्री उशिरा शिफ्ट संपल्यानंतर आराम करण्यासाठी सेमिनार हॉलमध्ये गेली होती. ९ ऑगस्टला सकाळी तिचा मृतदेह सेमिनार हॉलमध्ये आढळून आला. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले तेव्हा कळले की, तिच्यावर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. तिच्या शरीरावर २५ जखमा होत्या. संजय रॉयनेच या डॉक्टरवर आधी बलात्कार केला आणि त्यानंतर अत्यंत क्रूरपणे तिची हत्या केली. तसेच मृतदेहाची विटंबना केली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये संजय रॉय सेमिनार हॉलमध्ये गेला होता आणि नंतर पहाटे ४.३० च्या सुमारास बाहेर आला हे दिसले होते.

# शरद पवार गटाचे उत्तम जानकर आमदारकीचा राजीनामा देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी विधानसभेच्या निवडणुकीनंतर ईव्हीएमचा मुद्दा अनेकदा उपस्थित केला. तसेच यावरून उत्तम जानकर यांनी आंदोलनाचाही इश-ारा दिला होता. तसेच बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणीही त्यांनी केली होती. यानंतर आता उत्तम जानकर ईव्हीएमच्या मुद्द्यावरून आक्रमक झाले आहेत. आता आमदार उत्तम जानकर यांनी मोठा निर्णय घेणार असल्याचं जाहीर केलं आहे. २३ जानेवारी रोजी आपण आमदारकीचा राजीनामा दिल्लीत निवडणूक आयोगाकडे देणार आहे, असं उत्तम जानकर यांनी म्हटलं आहे. तसेच माळशिरस मतदारसंघात बॅलेट पेपरवर पोटनिवडणूक घेण्यात यावी अन्यथा आम्ही दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करणार असल्याचंही जानकर यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता ईव्हीएमचा मुद्दा पुन्हा तापण्याची शक्यता आहे. ईव्हीएमच्या मुद्याला मारकडवाडीत गा-वातून सुरुवात झाली आणि तोच आक्रोश संपूर्ण माळशिरस तालुक्यात आहे. आता माळशिरस तालुक्यातील धानोरे या गाव-ात देखील ग्रामसभेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्या ठिकाणी १२०६ लोकांनी हात वरती करून मतदान केलं. पण त्या गावात मला ९६३ एवढेच मते दाखवण्यात आलेली आहेत.

# सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी जयकुमार गोरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यात माहिती सत्ता स्थापनेनंतर राज्यात विविध ठिकाणी पालकमंत्री पदासाठी विशेष उत्सुकता लागून राहिली होती. शनिवारी शासनाचे उपसचिव दिलीप देशपांडे यांनी याबाबत परिपत्रक काढत पालकमंत्री पदाची यादी जाहीर केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गडचिरोलीचे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे पुणे व बीडचे तर एकनाथ शिंदे हे मुंबई व ठाण्याची पालकमंत्री असल्याचा समावेश आहे तर सोलापूर माहितीचा रसिकेमध्ये मालक बापू का दादा यामध्ये नंबर मारला तो राज्याची सध्याची ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूरच्या पालकमंत्री पदी कमर गोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे यापूर्वी उच्च व शिक्षण तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील हे सोलापूरचे पालकमंत्री होते व सोलापूर जिल्हा जिल्ह्याला प्रथमच येतोय चेहरा जयकुमार गोरे यांच्या रूपाने मिळा-लेले सोलापूरकरांना गोरे यांच्याकडून विकासाच्या दृष्टिकोनातून विशेष अशी अपेक्षा आहे ही निवड प्रक्रियेबद्दल विविध क्षेत्रातील लोकप्रतिनिधी सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



## १० वी, १२ वीच्या हॉल तिकीटांवर जातप्रवर्गाचा उल्लेख; दहावी, बारावी परिक्षेआधीच वाद

(पान १ वरून..) ॉमाध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी या सर्व प्रकरणावर स्पष्टीकरण दिलं आहे. गोसावी म्हणाले, हॉल तिकिटांवर जात नव्हे तर जात प्रवर्गाचा उल्लेख आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी हा उल्लेख केला आहे. शरद गोसावी म्हणा-ले, शाळा सोडल्यानंतर शाळेच्या किंवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरमध्ये विद्यार्थ्याला त्याचं नाव, त्याच्या पालकांचे नाव, जात अथवा जात प्रवर्गात कुठलीही चूक झाली असेल तर ती दुरुस्त करून येत नाही. अनेकदा विद्यार्थ्यांच्या जातीचा अथवा प्रवर्गाचा उल्लेख चुकलेला असतो. त्यामुळे भविष्यात त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अनेक विद्यार्थी अशा तक्रारी घेऊन आमच्याकडे येतात. नियमानुसार विद्यार्थ्यांनी एकदा का शाळा सोडली की त्याला शाळेच्या जनरल रजिस्टरमध्ये त्याचं नाव, आडनाव, आई-वडिलांची नावे, जन्मतारीख किंवा जातीच्या उल्लेखात कोणताही बदल करता येत नाही. यात एखादी चूक असेल तर हे हॉल तिकीट त्यांच्या उपयोगी पडणार आहे. हॉल तिकिटावर एखादी चूक असेल तर ती आत्ताच निदर्शनास आणून देता येईल आणि दुरुस्त करून घेता येईल. या एकमेव उदात्त हेतूने राज्य शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटांवर जात प्रवर्गाची नोंद केली आहे. यामुळे विद्यार्थ्याला त्याच्या ना-वातच काय इतर कोणत्याही गोष्टीत चूक असेल तर ती बदल करण्याची संधी मिळते.

शरद गोसावी म्हणाले, हॉल तिकिटांवर विद्यार्थ्यांच्या जातीचा उल्लेख नाही तर जातप्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला आहे, म्हणजे ओबीसी, एसटी, एससी असा उल्लेख आहे. आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभागाकडून विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात. त्या शिष्यवृत्ती घेताना विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी त्यांच्या हॉल तिकीटांवर जातप्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला आहे. शाळेच्या किंवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या जनरल रजिस्टरवर विद्यार्थ्याच्या जातीची, जातप्रवर्गाची नोंद असेल तर त्यांना शिष्यवृत्ती मिळवणं सोपं होतं.

# शिवचरीत्र केवळ अभ्यासाचा विषय नसून आचरणाचा आहे

## शिवव्याख्याते प्रशांत देशमुख ; पंढरपूर अर्बन बँकेच्या व्याख्यानमालेस प्रारंभ





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : छत्रपती शिवाजी महार-ाज यांचे चरित्र हे केवळ ऐकण्याचा, अभ्यासाचा किंवा अभिमानाचा विषय नसून आजच्या युवकांनी याचे आचरण करण्याचा विषय आहे. महाराजांच्या एक एक घटना पाहिल्या तर यामधून याकाळात देखील जगण्याचा मंत्र मि ळतो असे प्रतिपादन रायगड येथील प्रसिध्द शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी केले.

येथील दि पंढरपूर अर्बन को. ऑप.बँकेच्या वतीने आयोजित देशभक्त कै.बाबुराव जोशी व्याख्यानमालेस प्रारंभ झाला असून याच्या पहिल्या दिवशी देशमुख हे बोलत होते. व्याख्यानम ालेचे उद्घाटन सौ.सीमाताई प्रशांत परिचारक यांच्या हस्ते तसेच बँकेचे अध्यक्ष सतीशजी मुळे, उपाध्यक्षा माधुरीताई जोशी यांच्या प्रमुख उप-स्थित करण्यात आले.प्रशांत देशमुख यांनी आपल्या अतिशय ओघवत्या व उत्स्फुर्त शैलीमध्ये उठ युवका जागा हो शिवचरित्राचा तू धागा हो या विषयावर जवळपास दीड तास उपस्थित प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

यावेळी बोलताना देशमुख यांनी, छत्रपती शिवाजी महाराज हा आ-पला स्वाभिमान असून मराठी माती-चे महान सुपूत्र आहेत. महाराजांच्या आयुष्यातील एक प्रसंग अतिशय विलक्षण असून यामधून मोठा संदेश मिळतो. जवळपास चारशे वर्षा नंतर देखील महाराजांनी दिलेली शिकवण, त्यांच्या आयुष्यात आलेले विविध प्रसंग पाहिल्यावर ते ज्या प्रम ाणे वागले ते पाहून आजच्या काळात देखील कसे जगावे याची शिकवण मिळते असे प्रतिपादन केले. यासाठी देशमुख यांनी काही उदाहरण दिली. आजची पिढी लगेच हताश होते, टोकाचे पाऊल उचलून आत्महत्येचा म ार्ग स्वीकारते. मात्र महाराजांनी मोठ्या कष्टाने राज्य मिळविले. मात्र मिर्झाराजे जयसिंग यांच्या बरोबर झालेल्या तहात त्यांना आपले किल्ले व अनेक गोष्टींचा त्याग केला. परंतु तरीही त्यांनी हार म ानली नाही, औरंगजेबाच्या कैद म्हणजे मृत्यू परंतु यावरही हुशारीने मात करून तेथून निसटले असे प्रसंग पाहिल्यावर संकटाला पाठ न दाखविता त्यावर मात करणे शिकवते. शत्रुच्या स्त्रीवर हात टाकणार्या आपल्या सरदाराला व पत्नीच्या भावाला देखील भर सभेत शिक्षा करून त्यांनी कायदा सर्वांना समान असल्याचा संदेश दिला. सुरते मध्ये विधवा स्त्रीच्या घराचे संरक्षण केले कारण तीचा पती वारला होताच परंतु तो दानधर्म करणार होता. यावरून चांगल्या कर्मावर त्यांचा विश्वास होता. सर्व जातीला बरोबर घेण-ारा, त्यांच्यातील गुणांना वाव देणारा हा राजा सर्वोत्तम नेता होता असे सांगून देशमुख यांनी केवळ घोषणाबाजी करून महाराज समजणार नाहीत यासाठी त्यांच्या शिकवणुकीचे आ-चरण करा असा सल्ला प्रशांत देशमुख यांनी दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे संचालक हरिष ताठे यांनी, सूत्रसंचलन शांताराम कुलकर्णी यांनी तर आभार डॉ.संगिता पाटील यांनी मानले.

यावेळी पांडुरंग कारखान्याचे माजी अध्यक्ष दिनकर मोरे, बाजार समितीचे माजी सभापती दाजी भुसनर, पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांतभैय्या देशमुख यांच्यासह पंढरपूर अर्बन बँकेचे संचालक पांडुरंग घंटी, विनायक हरिदास, अमित मांगले, गणेश शिंगण, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, तज्ज्ञ संचालक प्रभुलिंग भिंगे, उदय उत्प-ात, सोमनाथ होरणे आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा ठाण जिल्ह्याच्या वतीने पत्रकार दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी :/मिलिंद जाधव :

पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गो-विंद वाकडे व राज्य संघटक संजयजी भोकरे यांच्या आदेशान्वये राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या मार्गर्शनाखाली दिनांक ६ जानेवारी २०२५रोजी बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पन दिनानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ,मुंबई शाखा ठाणे जिल्हाच्या वतीने जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांच्या संकल्पनेतून

संघटनेच्या २५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून

भिवंडी तालुक्यातील नवल (ऋषी) फार्म हाऊस, कांदळी (हायवे) येथे पत्रकारांचा सत्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा




सत्कार, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप , पत्रकार संघाची दिनदर्शिका प्रकाशन सोहळा असे विविध उपक्रम हाती घेत सामाजिक बांधिलकी जपत 'पत्रकार दिन' साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ .विश्वासराव आरोटे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्याध्यक्ष संतोष गायकर , नवी मुंबई जिल्हाध्यक्ष चव्हाण,पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, भिवंडी पंचायत समितीचे माजी सभापती अशोक शेरेकर, प्रकाश भोईर,

पडघा डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, माजी सरपंच किरण वारघडे उपस्थित होते.


पत्रकार संघाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात असून सामाजिक बांधिलकी जपण्यात येते. व पत्रकारांना मदतीचा हात देण्यात येतों असे यावेळी राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी बोलताना सांगितले.

पत्रकारितेच्या माध्यमातून सत्य जगासमोर आणण्याचं काम पत्रकार करत असतात. पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी पत्रकार संघ नेहमीच पाठीशी असेल, असे ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे यांनी बोलतांना सांगितले.

पत्रकार मला व माझ्या पो-लीस दलाला सहकार्य करीत असतील तर माझीही जबाबदारी आहे.त्या पत्रकार बांधवांना सहकार्य करण्याची त्यांच्या उपक्रमात सहभागी होण्याची , आदिवासी वाडीतील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक. साहित्य वाटप करणारे पत्रकार बंधूंचे सामाजिक कार्याने मी भारावून गेलो असे पडघा पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बाळा कुंभार यांनी बोलताना सांगितले.

भगवान चंदे हे गेल्या २२ वर्षापासून आपल्या लेखणीतून विविध विषयाला हात घालून अन्यायाला वाचा फोडण्याचे काम पत्रकारितेतून सातत्याने करीत आ-हेत. म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई शाखा ठाणे जिल्ह्याच्या वतीने ठाणे जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम राबवत असून एक सामाजिक बांधिलकी जपत आहेत. म्हणुन त्यांच्या कार्याची दखल घेऊन ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान चंदे याना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर यावेळी पत्रकार मेघनाथ (भिवंडी) योगेश गोडे, (कल्याण)श्रद्धा ठोंबरे (बदलापूर) नरेश पाटील (भिवंडी) अनिल वर्मा (भिवंडी) वसंत पानसरे ( शहापूर) मिलिंद जाधव ( पडघा, भिवंडी) यांना उत्कृष्ट पत्रकारिता म्हणून प सन्मानित करण्यात आले. कातकरी आदिवासी कांदळी शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे साहित्य वाटप करीत. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष सुभाष विशे, जिल्हा सचिव नरेश पाटील, प्रकाश जाधव, संजय भोईर, सतीश घरत, सिद्धार्थ गायकवाड,नितीन पंडित,संजय भालेराव, शांताराम गांगुर्डे, राकेश शिवदे, दिनेश घन-घाव, योगेश गोडे, मोनिष गायकवाड, शेखर भोईर, नाना म्हात्रे, राजू चंदणे, अनिल पाटील, श्रद्धा ठोबरे, विकी उंबरगोडे, संतोष चोंनकर, सतिष घरत अनंता घागस, मनीष दोंदे, शांताराम गांगुर्डे, संघरत्न घनघाव, हुसेन शेख, चंद्रकांत भोईर, कैलास मस्के, भूपेंद्र आंबावने,मनीष गायकवाड, प्रवीण. आंब्रे. अनिल गजरे, दीपक विश्वकर्मा, गोविंद. भोईर, कल्याणरावते हनवते, कैलास म्हस्के यांना सन्मानित करण्यात आले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी म हाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे, भिवंडी तालुका अध्यक्ष मेघनाथ विशे, जिल्हा सहसचिव मिलिंद जाधव यांनी मेहनत घेतली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार मिलिंद जाधव यांनी तर आभार मेघनाथ विशे यांनी केले.

# क्लाउड कंप्यूटिंग हे आयटी क्षेत्राच्या उज्वल भविष्यासाठी कारणीभूत ठरेल : प्रा. पूनम पाटील




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/शहर प्रतिनिधी :

क्लाउड कंप्यूटिंग ही एक अशी व्यवस्था आहे. जी आपण आपल्या व्यवसायाशी निगडित कॉम्प्युटरवर करत असलेले काम किंवा महत्त्वाच्या नोंदी आभासी पद्धतीने साठवून ठेवते. हे एक अद्वितीय तंत्रज्ञान आहे जे इंटरनेट कनेक्शन असल्यास कधीही आणि कुठेही वापरता येऊ शकते. क्लाउड कंप्यूटिंगमुळे आयटीक्षेत्रात झपाट्याने प्रगती होत आहे. त्यामुळे क्लाउड कंप्यूटिंग हे आयटीक्षेत्राच्या उज्वल भविष्यासाठी कारणीभूत ठरेल. असे प्रतिपादन प्रा.पूनम पाटील यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित, के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक महाविद्यालय काकासाहेबनगर महाविद्यालयात ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या वतीने एकदिवसीय 'क्लाउड कंप्यूटिंग' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हा प्रमुख अतिथी म्हणून प्रा.पूनम पाटील बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल गवारे होते, त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, जग झपाट्याने बदलत आहे. आपल्याला जर या जगाशी जोडून घ्यायचे असेल तर नवनवीन तंत्रज्ञानाचा अंगीकार करून आपल्यातल्या कौशल्याचा विकास करावा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अंकिता पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रियंका जाधव हिने केले. तसेच आभार प्रा.काजल वाघ यांनी मानले.

कार्यक्रमास प्रा. शीतल जगताप, , प्रा. वैशाली शिंदे, प्रा. मुक्ता मोरे, प्रा. भारती कुशारे, प्रा. जयश्री कापडी आदी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

## बस मध्ये चढताना तरुणाचा मोबाईल लंपास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : सोलापूर एसटी स्टँड येथील सोलापूर ते तुळजापूरला जाणाऱ्या बस मध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी अभिनय दयानंद भगत (वय-२४,रा.भगत अली नाका,आवास,जिल्हा रायगड) यांच्या पँटीच्या खिशात अस-लेला ३५ हजार रुपये किम तीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना १४ जानेवारी रोजी घडली.याप्रकरणी अभिनय भगत यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात सोडत्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चुंगे हे करीत आहेत.

तसेच दुसऱ्या घटनेत फिर्यादी लक्ष्मण शेटप्पा इडोगोटे (वय-३३,रा.भवानी पेठ,म ड्डी वस्ती) हे अंत्ययात्रेला गेल्यावर अज्ञात चोरट्याने गद-ींचा फायदा घेऊन तीस हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. ही घटना १५ जा-नेवारी रोजी कल्पना टॉकीज मुरारजी पेठ येथे घडली. याप्रकरणी लक्ष्मण इडोगोटे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चुंगे हे करीत आहेत.

## ज्योतिष विशारद श्री संतोष भाऊ जाधव श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र कारवाडी यांचे समुपदेशनपर व्याख्यान

# न्यू इंग्लिश स्कूल अँड जुनिअर कॉलेज व अभिनव बाल विकास मंदिर वडांगळी विद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वडांगळी/प्रतिनीधी : न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज व अभिनव बाल विकास मंदिर वडांगळी विद्यालयामध्ये प्रसिद्ध समुपदेशक तसेच ज्योतिष विशारद श्री संतोष भाऊ जाधव श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र कारवाडी यांचे समुपदेशनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री बाळासाहेब खैरनार होते . विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ मंगला हांडे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी हे देखील या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमांतर्गत विद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्यानांचे आयोजन करण्यात येत आहे . आज शनिवार रोजी जिल्ह्यातील सुप्रसिद्ध सम ुपदेशक व ज्योतिष विशारद श्री संतोष भाऊ जाधव श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र कारवाडी यांचे विद्यार्थ्यांना शालेय जी-वनातील संस्कार या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आई वडील व गुरुजन यांचे शालेय जीवना-तील महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणे देऊन समजावून सांगितले .जीवनामध्ये ध्येय गाठायचे असतील तर विद्यार्थी संस्कारक्षम असणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले .विद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांचे आई अथवा वडील यांचे निधन झालेले आहे अशा सर्वांना व्यासपीठावर बोल-ावून इतर विद्यार्थ्यांना आई-वडिलांचे महत्त्व या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सम जावून सांगितले. उपस्थित सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी याप्रसंगी अत्यंत भावनिक झाल्याचे दिसून आले. कु. शितल मधुकर वीरकर व कु .वैष्णवी एकनाथ वडितके या विद्यार्थिनींचे आई- वडील मृत्यू पावलेले असल्याने सदर विद्यार्थ्यांनीचा शैक्षणिक खर्च व शालेय गणवेश व भविष्यामध्ये विवाहासाठी येणारा खर्च आपण करणार असल्याचे त्यांनी यावेळी प्रतिपादन केले . विद्यालयाचे प्राचार्य श्री बाळासाहेब खैरनार यांनी आई, वडील व शिक्षक यांच्यामार्फत शालेय जीवनामध्ये विद्यार्थ्यांवरती खऱ्या अर्थाने संस्कार घडत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलां प्रमाणे गुरुजनांना देखील आदर्श मानून आपल्या जीवनामध्ये प्रगती साधावी तसेच राष्ट्र हे सर्वोच्च आहे. राष्ट्राच्या प्रगतीसाठी सुजाण व संस्कारक्षम नागरिक शालेय जीवना-




तील संस्कारामुळे घडतात असे यावेळी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर यांनी विशेष परिश्रम घेतले .कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक शंकरराव सांगळे यांनी केले तर आभार प्रदर्शन संदीपराव मस्के यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# देशात स्वामित्व योजनेंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून सनद वितरणाचा शुभारंभ

## महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच मुख्यमंत्री यांच्या हस्ते सनद वितरण; सोलापूर जिल्ह्यात आमदार सचिन कल्याणशेट्टी व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते सनद वाटप शुभारंभ

### स्वामित्व सनद वाटप योजना ही ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचा एक प्रयत्न : आमदार सचिन कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : :केंद्र सरकारच्या स्वामित्व योजने अंतर्गत आज दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी संपूर्ण देशातील २४६ जिल्ह्यातील ५८ लाख लाभार्थी यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते आभासी पध्दतीने सनद वाटप कार्यक्रम झाला. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील ३९ गावांमधील ४ हजार ८५९ स्वामित्व सनद वाटप जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सचिन कल्याणशेट्टी व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

स्वामित्व सनद वाटप कार्यक्रम नियोजन भवन येथील सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आमदार सचिन कल्याणशेट्टी होते तर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा भूमिलेख अधीक्षक दादासाहेब घोडके, नगर भूमापन अधिकारी गजानन पोळ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी स्वामित्व योजने बाबतचे व ग्रामीण विकासाबाबतचे महत्व सर्वांना पटवून सांगितले. या अंतर्गत ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचा एक प्रयत्न आहे. त्यानुसार केद्र शासन, भूमि अभिलेख विभाग व ग्रामविकास यंत्रणामार्फत लोकांना स्वांतत्र्यपूर्व काळापासुन अद्यापपर्यंत न झालेले त्यांचे घरांचे अभिलेख तयार करुन त्यांचा मालकी हक्काचा पुरावा म्हणून प्रत्येक गावठाणामधील घरांचा नकाशा व सनद अत्याधूनिक ड्रोन सर्व्हे द्वारे तयार केले आहेत. या तयार झालेल्या अभिलेखामुळे गावामधील लोकांना देखील गृहकर्ज मिळणेस मदत होणार आहे. त्या मिळणा-या कर्जामुळे लघु उद्योगधंदे यांना चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### स्वामित्व योजनेमुळे जनतेच्या उत्पन्नात वाढ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**स्वामित्व योजनेद्वारे देशातील जनतेच्या उत्पन्नात वाढ होत असून यामुळे त्यांच्या आशा-आकांशा पुर्ण करत आहे. स्वामित्व योजनेंतर्गत जनतेला देण्यात आलेल्या कायदेशीर सनदेमुळे त्यांना मदत होत असून या सनदेच्या आधारे बँकेतून कर्जाद्वारे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल, असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितले.**

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख श्री. घोडके यांनी स्वामित्व योजनेचे व सनदचे महत्व विषद केले व त्यासंदर्भातील चित्रफित सादर केली. यावेळी जिल्ह्यातील ३९ गावांमधील ४८५९ नागरिकांना स्वामित्व हक्काची सनद मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आली. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आमदार सचिन कल्याण शेट्टी व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सनद वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. घोडके यांनी केले तर आभार गजानन पोळ यांनी मानले.

केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राज मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सह्याद्री अतिथीगृह येथून ऑनलाईन उपस्थित होते. मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, भूमी अभिलेख जमाबंदी आयुक्त व संचालक डॉ.सुहास दिवसे, विभागीय आयुक्त राजेश देशमुख तसेच पालघर, रायगड, ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी उपस्थित होते.

देशातील गरीबी कमी करायची असेल तर प्रत्येक नागरिकांजवळ मालमत्तेचे अधिकार असणे गरजेचे आहे असे सांगून प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, देशातील लाखभर लोकांकडे संपत्ती असूनही त्यास किंमत मिळत नव्हती. स्वत:चे घर असूनही काही लोक त्यावर कब्जा करत होते. २०१४ पासून आम्ही देशातील नागरिकांचे ड्रोन द्वारे सर्व्हेक्षण करून त्यांना प्रापर्टी कार्ड वितरित करत आहो. यामुळे लोकांचे जीवन बदलणार असल्याचे प्रधानमंत्री यांनी सांगितले. स्वामित्तव योजनेंतर्गत या प्रॉपर्टी कार्डमुळे देशातील भ्रष्टचार कमी होणार आहे. आज ९८ टक्के भूमी अभिलेखाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. आज गावोगावी शौचालये, उज्वला गॅस, जलपुरवठा, आयुष्यमान, सडके, इंटरनेट, ब्रॉडबँड सोबत कॉमन सर्व्हीस सेंटर या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. शहरामध्ये मिळणाऱ्या सुविधा आता गावात मिळत आहे. देशातील गरीब सशक्त झाला तरच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

### जिल्ह्यातील ३९ गावांमधील ४ हजार ८५९ नागरिकांना स्वामित्व सनद वाटप



**प्रधानमंत्री स्वामित्व योजनेतून ग्रामीण भारताच्या सक्षमीकरणास चालना : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

प्रधानमंत्री स्वामित्व योजनेच्या पथदर्शी प्रकल्पात महाराष्ट्राचा समावेश होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास असा दृष्टिकोन आहे. ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या प्रगतीचा आधार आहे, ही जाणीव ठेवूनच स्वामित्व योजना आखण्यात आली आहे. राज्यातील सुमारे ६० लाख हून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होईल. ही योजना केवळ शासकीय उपक्रमापुरती मर्यादित नसून, ती ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय प्रणालीत आमूलाग्र बदल घडविणारी आहे. ग्रामीण भागातील जमिनीच्या मालकीबाबतची अनिश्चितता आणि वाद कमी होणार आहेत. अनेकांना जमिनींचा कायदेशीर हक्क सिद्ध करणे कठीण जाते. यामुळे केवळ न्यायालयीन प्रकरणे वाढतात. अनेकदा विकास प्रक्रियादेखील थांबते. या समस्येचे स्वामित्व योजनेमुळे निराकरण होईल. या योजनेद्वारे गावांतील जमिनींची मोजणी अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाच्या मदतीने केली जाते आणि प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या मालकीच्या जमिनीचे कायदेशीर प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र केवळ मालकीचा पुरावा नसून, त्यामागे आर्थिक सक्षमीकरणाची मोठी संधी ठरेल, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

स्वामित्व योजनेंतर्गत राज्यपाल श्री.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील विनोद आत्माराम पिंपळे, माया विकास पिंपळे, सदानंद वामन पिंपळे, दिलीप यशवंत सपाटे, प्रकाश शांताराम रावते, अलिबाग जिल्ह्यातील रोहण कृष्णा पाटे, शैलेश यशवंत ठाकूर, मिलिंद पांडुरंग पडते, प्रभाकर शांताराम नाईक, अंकुश सिताराम धाके आणि ठाणे जिल्ह्यातील विष्णू चुरू आंबेकर, यमुनाबाई रामचंद्र पाटील, मधुकर तुकाराम पाटील आणि चेतन गजानन पाटील यांना सनद वाटप करण्यात आले.

## थोडक्यात...

### सिद्धेश्वर पेठेतून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : सिद्धेश्वर पेठ येथे पार्किंग करून ठेवलेली दुचाकी क्रमांक १३ सीडी ५५८१ अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १४ जानेवारी रोजी रात्री साडेआठ ते साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी नरेश अनिल संगा (वय-४५,रा.किरण नगर,स्वागत नगर रोड) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

### दुकानाचे कुलूप तोडून रक्कम सह वस्तू चोरले

सोलापूर, (प्रतिनिधी) : जोडभावी पेठ येथील साई ट्रेडिंग कंपनी या दुकानाचे कुलूप कशाच्यातरी साह्याने तोडून अज्ञात चोरट्याने दुकानात प्रवेश करून ८५ हजार रुपये रोख रक्कम व दुकानातील वस्तू,किराणामाल चोरून नेल्याची घटना १६ ते १७ जानेवारी दरम्यान घडली.याप्रकरणी किशोर बनकटलाल भट्टड (वय-६४,रा. सम्राट चौक) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पडसळकर हे करीत आहेत.

# सकल मराठा समाजाच्या वतीने बुधवारी आक्रोश मोर्चाचे नियोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सरपंच संतोष देशमुख व परभणीतील सोमनाथ सुरोशे यांच्या हत्येच्या निषेधार्थ अखंड मराठा समाजाच्या सोलापूर जिल्ह्याच्या वतीने बुधवार दिनांक २२ रोजी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सोलापूर येथील समन्वयक रवी मोहिते यांनी दिली.

या मोर्चा संघर्ष योद्धा मनोज सारंगे पाटील आमदार सुरेश धस, यांच्यासह देशमुख व सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील सदस्य देखील उपस्थित राहणार आहेत,

याबाबत माहिती देण्यासाठी मराठा समाजातील पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते या संभाजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, कुर्डूवाडी चे संजय टोणपे, संभाजी ब्रिगेडचे दीपक वाडदेकर किरण घाडगे, स्वराज्य पक्षाचे महादेव तळेकर, किरण भोसले, दिगंबर सुडके, विनोद लटके, महेश पवार आकाश पवार, बंटी भोसले आधी सह पदाधिकारी उपस्थित होते.

### मोर्चामध्ये देशमुख व सूर्यवंशी कुटुंबातील सदस्य उपस्थित राहणार

यावेळी बोलताना मोहिते यांनी, सरपंच संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली आहेच, परंतु परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांची देखील पोलीस कोठडीत हत्याच केल्या असल्याचा आरोप केलाय, या दोन्ही प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी केली तर, दीपक वाडदेकर यांनी या प्रकरणाचा तपास योग्य दिशेने होण्यासाठी तसेच यातून आरोपींची नावे वगळी जाऊन येते यासाठी आक्रोश मोर्चा आयोजित केला असल्याची माहिती दिली.

### मागील भांडणावरून लाथा बुक्क्यांनी मारहाण; सात जणांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : मागील भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करत तुम्हाला येथे खल्लास करतो असे म्हणून दमदाटी करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची फिर्याद सुभद्रा जनार्दन बनसोडे (वय-२२,रा.मातंग वस्ती,शुक्रवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मच्छिंद्र बनसोडे, शहा मच्छिंद्र बनसोडे, योगेश बनसोडे, दादावर बनसोडे,अमोल बनसोडे, टिल्लेश अनिल बनसोडे, विनोद खंडू बनसोडे (सर्व.रा.मातंग वस्ती,समाचार चौक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १६ जानेवारी रोजी रात्री शुक्रवार पेठ समाचार चौक येथे घडली. तपास पोसई.जाधव हे करीत आहेत.

# निफाड पोलीस स्टेशन येथे तक्रार निवारण दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे १०० दिवसाचे सात कलमी कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत राज्यभर तक्रार निवारण दिन साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून निफाड पोलीस स्टेशन येथेही पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस अधीक्षक मिरखेलकर यांचा सूचना प्रमाणे निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, यांचे प्रमुख उपस्थितीत निफाड पोलीस स्टेशन येथे तक्रार निवारण दिन साजरा करण्यात आला, या दरम्यान नागरिकांच्या तक्रारी वर आढावा बैठक घेण्यात आली, असून त्यामध्ये ३० ते ४० तक्रारदार उपस्थित होते त्यातील अर्जदार व गैर अर्जदार यांचे छोटे मोठे




वाद यावेळी आपसात मिटलेले असून ज्या तक्रारींचे निरसन झालेले नाही त्याबाबत योग्य चौकशी करून कारवाई करण्यात येणार आहे ,यावेळी शेतकऱ्यांच्या शिवरस्त्याबाबत, शेतीच्या बांधाबाबत ,तसेच घरगुती किरकोळ वाद, फसवणुकीचे तक्रार संदर्भाने गुन्हे ,अशा विविध समस्या तक्रारींचा यामध्ये समावेश होता, याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक ईश्वर पाटील, विश्वनाथ निकम, तसेच पोलीस कर्मचारी कपालेश्वर ढिकले, विक्रम लहाने, मच्छिंद्र खरात, नितीन सांगळे ,योगेश खर्जे, अनिल शेरेकर ,राजेंद्र दरोडे, विकास जाधव , सुनील सानप,सागर जाधव, रवींद्र बाराहाते ,धनंजय जाधव, किरण ढेकळे ,आर.बी मनोहर, साळवे ,सागर घोलप ,तसेच सोनाली शिंदे ,दीपिका चव्हाण व तक्रारदार नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डीबी पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे दोन आरोपींना केले गजाआड**

**चार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त**

# मोहोळ पोलीस ठाण्याची दमदार कामगिरी: फसवणूक व घरफोडी उघडकीस आणण्यात पोलिसांना यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मोहोळ पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने फसवणूक घरफोडी हे दोन गुन्हे उघड केल्याने पोलीस यांना यश आले. डी.बी. पथकाने कौशल्यपूर्ण तपास व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे दोन गुन्हे वर्ड कीस करून दोन आरोपींना गजाआड केले. अभिनेत्याच्या ताब्यातून जवळजवळ चार लाख रुपये चा मुद्देमाल जप्त केला.

यासंबंधी मिळालेली अधिक माहिती अशी की मोहोळ तालुक्यातील शिरापूर येथील रंजना अशोक खांडेकर या महिलेस अज्ञात आणि तिच्या गळ्यातील मंगळसूत्राच्या बदल्यात जास्तीचे सोने देण्याचा अभिमान करून अर्धा तोळे वजनाची सोन्याची मंगळसूत्र काढून घटनास्थळावरून काढता पाय घेतला होता ही घटना मोहोळ शहरातील पाटील हॉस्पिटल जवळ पाच जानेवारी रोजी घडली होती.

याप्रकरणी दखल घेतल्यानुसार मोहोळ पोलीस ठाण्यात श्री एन एस कलम ३१८ (४) प्रमाणे आज्ञा देशमुख गुन्हा दाखल करण्यात पोलीस हेडकॉन्स्टेबल दयानंद हेंबाडे यांच्याकडे हा गुन्हा तपास देण्यात आलेला होता या गुन्ह्याच्या तपासा डीबी पथकातील अंमलदारांनी सीसीटीव्ही फुटेज पाहणी व गोपनीय खबऱ्याकडून मिळालेली महत्त्वपूर्ण माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अभिमान बापू तुपे तालुका पीटी तालुका पाटोदा जिल्हा बीड याचा शोध घेऊन त्याच ताब्यात घेतले आहे.

त्यांच्या ताब्यातून फसवणूक केलेली अर्धा तोळे सोन्याची मंगळसूत्र हस्तगत करण्यात आले याची बाजार मूल्यांकन किंमत ३०००० रुपये आहे व या गुन्ह्यावरून अभिमान तुपे याला अटक करून कसून तपास करतात त्यांच्याकडून अन्य अनोळखी आरोपीची नावे निष्पन्न करण्यात यश आले.

**या गुन्ह्यात सोलापूर यांनी तपासणीची पाहणी करून गुण्याच्या अनुषंगाने सखोल माहिती घेऊन तसेच गोपनीय माहिती दाराकडून यांच्याकडून माहिती घेऊन तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या अवलोकन करून संशयित आरोपी धीरज कैलास गुंड राहणार आष्टी यास ताब्यात घेतली.**

मोहोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे आष्टी येथील संगीता दत्तात्रय माने यांच्या घरात कोणी नसल्याचे पाहून चोरट्याने कपाटातील लॉकर तोडून हा साडेतीन लाख रुपये चोरून नेणे हा प्रकार मकर संक्रांतीच्या अगोदर १३ जानेवारी रोजी घटना या प्रकरणी दखल तक्रारी अनुसार मोहोळ पोलीस ठाण्यातील भारतीय संहिता कलम ३०५, ३३१, (३) प्रमाणे आज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला या गुन्ह्याच्या तपासात पोलीस हेडकॉन्स्टेबल दयानंद हेंबाडे यांच्याकडे सोपवण्यात आलेला होता.

पोलिसांनी त्यांच्याकडे चौक कौशल्याने कसून चौकशी केली त्यात त्यांना केलेल्या गुन्हेची कबुली दिली व घोरपडी या गुन्ह्यातील चोर चोरीस गेलेल्या साडेतीन लाख रुपयांपैकी तीन लाख ४५ हजार रुपयांची रोकड जप्त करून हा गुन्हा वर केस आणला आहे डीबी पथकाने फसवणूक आणि घोरपडी पुढे गुन्हेतील तीन लाख ७५ हजार रुपये मुद्देमाल जप्त केला आहे.

यात उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी (सोलापूर ग्रामीण) अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस वरिष्ठ निरीक्षक हेमंत शेंडगे पोलीस उपनिरीक्षक अजय केसरकर बेबी पथकातील पोलीस हेडकॉन्स्टेबल दयानंद हेंबाडे पोलीस हेड कॉन्स्टेबल संदेश पवार पोलीस चंद्रकांत ढवळे पोलीस कॉन्स्टेबल अमोल जगताप संदीप पवार रविराज राठोड स्वप्निल कुबेर सुनील पवार हेड कॉन्स्टेबल पठाडे तो सायबर कडील केशव पठाण यांनी कामगिरी बजावली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

रविवार दि. १९ जानेवारी २०२५ 

### महिलेच्या गळ्यातील सोनसाखळीतील दोन वाट्या पळवल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : दोन अज्ञात चोरट्यांनी राँग साईडने मागून येऊन अचानकपणे दुचाकी वरील मागील बाजूस बसलेल्या इसमाने फिर्यादी नेता शशिकांत बसरगी (वय-३८-,रा.नरसिंग नगर,मसीहा चौक) यांच्या गळ्यातील १८ हजार रुपये किमतीचे तीन ग्राम वजनाचे सोन्याचे साखळीतील दोन वाट्या जबरदस्तीने ओढून जखमी करून घेऊन गेल्याची घटना १६ जानेवारी रोजी दुपारी नरसिंग नगर येथे घडली. याप्रकरणी निता बसरगी यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दोघा चोरटाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोसई. शिंदे हे करीत आहेत.

# स्वामित्व योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रॉपर्टी कार्डचे वितरण

## पात्र लाभार्थ्यांशी संवाद कार्यक्रमाचे देशभरात आयोजन









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतील स्वामित्व योजनेंतर्गत देशभरातील ५० हजारांहून अधिक गावांतील ५८ लाखांहून अधिक नागरिकांना प्रॉपर्टी कार्डचे वितरण केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर आदरणीय नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांशी संवाद कार्यक्रमाचे देशभरात आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सोलापूर येथे लोकप्रिय आमदार माननीय श्री.सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या स्वामित्व योजनेमुळे जमिनीचे सर्व कायदेशीर अधिकार आणि हक्क शेतकऱ्यांना मिळणार आहेत. गावठाणातील मिळकत पत्रिका तयार करणे आणि मालमत्तेचे ऋखड प्रणाली व ड्रोनच्या सहाय्याने नकाशे तयार करण्यात येत आहे. या माध्यमातून ग्राम पंचायत मिळकतीचे सर्वे होऊन त्या मिळकतीचा गावाच्या विकासासाठी उपयोग करता येईल, महसुलातही वाढ होईल आणि शेतकऱ्यांनाही बँकेमार्फत कर्ज घेणे सोपे होणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. कुमार आर्शिवाद, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी सौ. मनीषा कुंभार, जिल्हाअधिक्षक भूमिअभिलेख श्री. दादासाहेब घोडके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. इशाधिन शेळकंदे, श्री. गजानन पोळ, श्री. नितीन सावंत यांच्यासह भूमी अभिलेख अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### अंत्यविधीच्या गर्दीतून तिघांचे मोबाईल पळविले

सोलापूर (प्रतिनिधी) माजी महापौर कै.महेश कोठे यांच्या पार्थिवाच्या दर्शनासाठी व अंत्ययात्रेसाठी गेलेल्या तिघांचे ६३ हजार रुपये किमतीचे तीन मोबाईल चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना (दि.१५) रोजी घडली.याप्रकरणी शहरातील फौजदार चावडी पोलीस ठाण्यात एक तर एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यात अधिक माहिती अशी की,पहिल्या घटनेत रणजीत संजय कोकाटे (वय-२७-,रा.राखी अपार्टमेंट,गड दर्शन, दमानी नगर) यांचा ३० हजार रुपये किमतीचा चॉकलेटी रंगाचा विवो कंपनीचा व्ही २९ ई मॉडेलचा मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली.दुसऱ्या घटनेत लक्ष्मीकांत प्रकाश सरगम (वय-३६,रा.अशोक चौक) यांचा २५ हजार रुपये किमतीचा स्काय ब्ल्यू रंगाचा विवो १९०९ मॉडेलचा मोबाईल चोरून नेला.तिसऱ्या घटनेत श्रीहरी अंबादास गुर्रम (वय-४५,रा.२२७६/एच ग्रुप विडी घरकुल) यांचा आठ हजार रुपये किमतीचा काळ्या रंगाचा रेडमी नोट-०७ मॉडेलचा मोबाईल चोरून नेला आहे.

### अपघात प्रकरणी चालकावर गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) अपघात प्रकरणी डंपर चालकाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १७ जानेवारी रोजी तालुका पोलीस ठाणे समोर रस्त्यावर घडली.आमीन जमीर शेख (वय-२२,रा.कुरबान हुसेन नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाहन क्रमांक एम.एच.१३.इएफ.९३८८ यातील चालक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील क्रमांकाच्या चालकाने डंपर हा निष्काळजीपणाने वाहण चालवून कुमारी साक्षी विक्रम कलबुर्गी (वय-७) हिला कट मारून गेल्यामुळे मयत साक्षी कलबुर्गी हिच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे.तसेच अभिषेक कलबुर्गी यास दुखापत करून तेथे न थांबता पळून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या घटनेचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक केंद्रे या करीत आहेत.

# न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात भरला बालआनंद बाजार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उत्तर सोलापूर/प्रतिनिधी : उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथील श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बाल आनंद बाजार भरविण्यात आला होता.

या बाल आनंद बाजारास गावातील नागरिकांनी उस्फुर्तपणे प्रतिसाद देत बाल गोपाळांना कडून मोठ्या प्रमाणात वस्तू खरेदी केली आहे.तसेच या बाल आनंद बाजारात स्टॉल १५० लावण्यात आले होते.

**बाल आनंद बाजारास गावकऱ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद**

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले व माऊली महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलन संस्थेचे मार्गदर्शक बळीराम साठे यांच्या हस्ते करण्यात आले.

या बाल आनंद बाजाराचे उद्घाटन संस्थेचे आधारस्तंभ मार्गदर्शक बळीराम साठे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.


या बाल आनंद बाजार कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे मार्गदर्शक बळीराम साठे, संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र बळीराम साठे, मुख्याध्यापिका डॉ.वैशाली जितेंद्र साठे, सचिव दत्तात्रय गायकवाड, सुरेश साठे, संचालक जयदीप जितेंद्र साठे, उपसरपंच अनिल माळी, ग्रामपंचायत सदस्य दत्ता वीर, संपत गाडे, शरद गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य दिलीप जमदाडे, जीवन साठे, दिनेश साठे आदी मान्यवर उपस्थित होते.

हा बाल आनंद बाजार भरण्याचा उद्देश सांगता प्राचार्या मुख्याधपिका डॉ.वैशाली साठे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञाना बरोबरच व्यवहारिक ज्ञानाचे आकलन झाले पाहिजे, विद्यार्थ्यांच्या अंगातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी हा बाल आनंद बाजार भरविण्यात आला होता.

हा बाल आनंद बाजार यशस्वी पार पाडण्यासाठी पर्यवेक्षक प्रताप पाटील, शिक्षक दशरथ दराडे एस.एस.साठे, एच.एल.रावळे, सतिश नागणे, वाय.टी.मादाम, एस.डी सोनटक्के, सहशिक्षिका एस.जी.टेळे, सहशिक्षिका गाडेकर तसेच हायस्कूल मधील सर्व शिक्षकांनी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

या बाल आनंद बाजारास हायस्कूल मधील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोपगाव एसटी स्टँड चौक येथे गतिरोधक लवकर करावे, सरपंच ज्योती कुंडलिक फडतरे यांची मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर :पुण्यावरून बाबदेव घाट मार्गे सासवड कडे येणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्याचे कारण पुरंदर तालुक्यामध्ये जेजुरीचा खंडोबा, श्री क्षेत्र नारायणपूर, बालाजी मंदिर, कानिफनाथ मंदिर, भुलेश्वर, पुरंदर किल्ला, वीर चे श्रीनाथ मस्कोबा मंदिर, कोडीत श्रीनाथ मस्कोबा मंदिर इत्यादी धार्मिक स्थळे व पर्यटन क्षेत्र असल्याने येणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बोपगाव मधील एसटी स्टँड चौक येथे रस्ता ओलांडताना शाळकरी मुले वृद्ध यांना जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडावा लागतो, कारण भरधाव येणाऱ्या गाड्या सुसाट वेगाने धावत असतात यापूर्वी अनेक अपघात या चौकामध्ये या रोडवर अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे, काही व्यक्ती अपघातामध्ये गंभीर फ्रॅक्चर झालेल्या आहेत, त्यामुळे प्रामुख्याने एसटी स्टँड चौक व कानिफनाथ मंदिर कमाणी समोर गतिरोधकांची व दिशादर्शक फालकांची ग्रामस्थांची फार दिवसापासून ची मागणी आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे वेळीच लक्ष देऊन गतिरोधक व दिशा फलक तयार केले तर अपघाताला वेळीच आळा बसेल, वेळेत एसटी स्टँड चौक व कानिफनाथ मंदिर कमाणी समोर गतिरोधक व दिशा दर्शक फलक तयार करावे अशी ग्रामस्थांची मागणी आहे.



# नळदुर्ग येथील प्रबोधिनी दादासाहेब बनसोडे हिस राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :

नळदुर्ग येथे जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग येथील इयता १० वीत शाळेत प्रथम क्रमांक पटकाविलेली विद्यार्थींनीं प्रबोधिनी दादासाहेब बनसोडे हिला सहाय्यक आयुक्त समाज कल्याण तथा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा अंतर्गत राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्काराचा पाच हजार रुपयेचा धनादेश देऊन सन्मान करण्यात आला.

**सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा उपक्रम**

२०२३ / २०२४ या वर्षी इयत्ता दहावीत शिकत असताना प्रबोधिनी दादासाहेब बनसोडे ही जिल्हा परिषद कन्या प्रशालेत प्रथम येण्याचा मान मिळविला होता त्यानंतर तेथील मुख्याध्यापक कमलाकर गायकवाड यांनी सदरील राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कारा साठी फाईल दाखल करण्यात आली होती त्या नुसार सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा मार्फत शाळेचे मुख्याध्यापक कमलाकर गायकवाड डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश मिडीयम स्कुलचे मुख्य प्रवर्तक तथा अध्यक्ष मारुती खारवे, सिव्हील अभियंता अजयकुमार बागडे पालक पत्रकार दादासाहेब बनसोडे सहशिक्षिका लिलावती कौरव शिक्षक दत्तात्रय सगर, केंद्र प्रमुख सत्तेश्वर जाधव, मिलींद कुलकर्णी, हारुण आत्तार, अश्विनी साळुंखे, निर्मला गावित, प्रज्ञा कांबळे लिपीक आप्पा स्वामी आदि जनांच्या उपस्थितीत पाच हजार रुपयेचा चेक धनादेश पुरस्कार देण्यात आला. या धनादेश पुरस्कार मिळाल्या मुळे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

**२५ कथांचा कथासंग्रह अमित प्रकाशनातर्फे झाला प्रकाशित**

**दत्ता पवार यांच्या अभिप्रायाचा लाभ**

# कोकण सुपुत्र कवी,लेखक अशोक लोटणकर यांच्या निराधार पुस्तकाचे प्रकाशन


**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

कोकण/केतन भोज :

रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील साखरपा शहरामधील मुर्शी गावचे सुपुत्र, मुलुंड येथे वास्तव्यास असलेले लेखक, कवी श्री.अशोक लोटणकर यांच्या २१ व्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले. निराधार हा २५ कथांचा कथासंग्रह अमित प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आला आहे. या कथासंग्रहास प्राचार्य आणि समीक्षक दत्ता पवार यांचा अभिप्राय लाभला आहे.

कोकणच्या पार्श्वभूमीवर आकाराला आलेल्या कथांमध्ये माणसांचे वास्तव दिसते, अशा शब्दात पवार यांनी आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. या सगळ्या कथा यापूर्वी विविध मासिके आणि दिवाळी अंकांमधून पूर्वप्रकाशित झाल्या आहेत. लोटणकर यांनी ललित गद्याबरोबरच काव्य, कथा, लघुकथा, बालसाहित्य, समीक्षा अशा साहित्यप्रकारात लेखन केले आहे. अंध विद्यार्थ्यांसाठी त्यांची काही पुस्तके ब्रेललिपीतही प्रसिद्ध झाली आहेत. लोटणकर यांना कोमसाप साहित्य पुरस्कार, कवी कुसुमाग्रज पुरस्कार असे प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत.

श्री.लोटणकर यांची एकूण २१ पुस्तके प्रकाशित झालेली असून त्यांच्या साहित्य कृतींना अत्यंत मानाचे असे ३० हून अधिक साहित्य पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. या पूर्वी त्यांना कोकण साहित्य रत्नया पुरस्कारानेही गौरविण्यात आलेले आहे. शिवाय एकता कल्चरल अकादमी, दादा गावकर सामाजिक प्रतिष्ठान, कै. नानासाहेब शेट्ये सामाजिक पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे.लोटणकर यांनी ७ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद भूषविले असून ते बी.ई.एस.टी. मधून डेपो मनेजर या पदावरून निवृत्त झालेले आहेत. श्री .लोटणकर हे अनेक शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांशी संबंधित आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील साखरपा- मुर्शी गावचे सुपुत्र लोटणकर यांचे हे पुस्तक प्रकाशित झाल्याबद्दल साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर, पत्रकार, वृत्तपत्र लेखक, ग्रामीण मंडळ,




विविध संस्था, प्रतिष्ठान पदाधिकारी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कोन्हाळी उपसरपंच अविश्वास प्रस्ताव नामंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुक्यातील कोन्हाळी ग्रामपंचायतचे विद्यमान उपसरपंच प्रतिका बनसोडे यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्ताव ५ विरुद्ध ४ अशा मतांनी नामंजूर करून विद्यमान उपसरपंच यांना कायम करण्यात आले.

उपसरपंच बनसोडे यांच्यावर अक्कलकोट तहसील कार्यालय येथे तहसीलदार विनायक मगर यांच्यासमोर सात सदस्य समक्ष उपस्थित राहून अविश्वास दाखल करण्यात आले होते. बुधवारी १५ जानेवारी रोजी ग्रामपंचायतमध्ये तहसीलदार यांच्या उपस्थितीत अविश्वास प्रस्तावावर प्रत्यक्ष आवाजी मतदान घेण्यात आले. त्या अनुषंगाने नऊ सदस्य व सरपंच असे दहा जणांना नोटीस काढण्यात आले होते. त्यानुसार बुधवारी बुधवारी ११ वाजता उपसरपंच यांच्या विरोधातील अविश्वास ठरावासाठी विशेष सभा घेण्यात आली. त्यात आक्षेप वाचून दाखविण्यात आले. सदस्य संख्या दहा असल्याने अविश्वास ठरावासाठी ३/४ म्हणजे आठ सदस्यांची गरज होती. तर विरोधी गटाचे सरपंच चिदानंद उण्णद यांच्या बाजूने उर्वरित ५ मतदान झाले.